महाराष्ट्र शासन
उच्च शिक्षण संचालनालय

# शिक्षण शुल्क समिती,मुंबई

( विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानीत शिक्षणशास्त्र महाविद्यालयांसाठी)
कार्यालयाचा पत्ता – शासकीय अध्यापक महाविद्यालय, एलफिन्स्टन तांत्रीक विद्यालय आवार,
१ ला मजला, ३ महापालिका मार्ग, धोबी तलाव, मुंबई–४०० ००१
E-mail :- sssbedmed@gmail.com /jd.hesss-mh@gov.in Website-www.sssmumbai.org Tel No. 022 22694478

---

**विषयः–दि.०८/०६/२०१६ रोजी सकाळी ११:०० वाजता मा.प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग तथा अध्यक्ष यांच्या दालनामध्ये पार पडलेल्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीचे इतिवृत्त...**

सदर बैठकीस खालील अधिकारी/पदाधिकारी उपस्थित होते.

१. डॉ. अण्णासाहेब स. खेमनार, प्राचार्य, सिडनहॅम वाणिज्य व अर्थशास्त्र महाविद्यालय, मुंबई– सदस्य
२. श्री. आनंद परतानी, सनदी लेखापाल, औरंगाबाद – सदस्य
३. सौ. संगिता रमाकांत गायकवाड, खाजगी शिक्षण व प्रशिक्षक संघटनेचे प्रतिनिधी, विद्याप्रतिष्ठान बारामती – सदस्य
४. डॉ.सुशीलकुमार चौधरी, सहसंचालक, शिक्षण शुल्क समिती, मुंबई– सदस्य
५. डॉ.धनराज माने, संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे – सदस्य सचिव
६. डॉ. देवेंद्र जोशी– विशेष निमंत्रित
७. डॉ. गो. वि. पारगांवकर, प्राचार्य, मुंबई शारीरिक शिक्षण मंडळाचे शारीरिक शिक्षण महाविद्यालय, वडाळा–बी.पी.एड., एम.पी.एड. साठी – निमंत्रित

**या बैठकीत घेण्यात आलेले महत्त्वाचे निर्णय खालीलप्रमाणे**

**बैठकीचा मुद्दाः–** मा. उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांच्याकडील याचिका क्रमांक ३८४/२०१६ च्या अंतरिम आदेशान्वये आर.सी. पटेल अध्यापक महाविद्यालय, शिरपूर यांचे शिक्षण शुल्क निश्चितीचे वर्ष २०१५–१६ करिता बी.एड. व एम.एड. अभ्यासक्रमांकरिता प्रस्ताव दि.१६.०४.२०१६ रोजी प्राप्त झाले. त्यांची छाननी शिक्षणशास्त्र तज्ज्ञ डॉ. पी. आर. गायकवाड, प्राचार्य, शासकीय अध्यापक महाविद्यालय, औरंगाबाद, सिडनहॅम महाविद्यालय येथील सनदी लेखापाल श्री. केतन शहा व यु. आर. बगाडे अ‍ॅन्ड कंपनी या खर्चलेखापाल यांनी केली. सनदी लेखापालास प्रस्तावात वाटलेली अपूर्णता आर.सी. पटेल अध्यापक महाविद्यालयाने दि.१७.०५.२०१६ रोजी ईमेलव्दारे व दूरध्वनीव्दारे पूर्तता केली आहे. सदर महाविद्यालयाची बी.एड व एम. एड चे वर्ष २०१५–१६ करिता शुल्क निश्चिती करणेबाबत. तसेच या व अशा प्रकारे मा. उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये प्राप्त होणा–या प्रस्तावांची फी निश्चितीबाबत धोरण ठरविणे.

बैठकीत चर्चेदरम्यान खालीलप्रमाणे ठरले...

१. शिक्षण शुल्क समिती ही शिक्षणशास्त्र व शारिरीक शिक्षणशास्त्र या अभ्यासक्रमांचे शुल्क निश्चितीकरिता शासन निर्णयांव्दारे गठीत करण्यात आलेली आहे. त्यामुळे अभ्यासक्रम हा किती वर्षासाठी आहे ? यावर शुल्काची निश्चिती होत नाही.
२. आर. सी. पटेल अध्यापक महाविद्यालय, शिरपूर यांचे शिक्षण शुल्क वर्ष २०१५–१६ करिता मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांनी दिलेल्या आदेशान्वये व प्राप्त प्रस्तावांन्वये छाननी

दरम्यान एम.एड. या अभ्यासक्रमाकरिता २०१०—११ या वर्षाकरिता ६४,०००/— प्रतिविद्यार्थी मंजूर होते ते २०१५—१६ या वर्षाकरिता गणनेव्दारे रू. ५४,९४०/—होते. ते रू. ९०६०/—एवढे कमी झाल्याचे आढळते. तसेच बी.एड करिता २०१०—११ या वर्षाकरिता रू. ५०,८७०— प्रतिविद्यार्थी एवढे मंजूर होते. त्यात २०१५—१६ या वर्षाकरिता गणनेव्दारे रूपये ५८,८२९/—होते. ते रू. ७९५९/— एवढे वाढल्याचे आढळते. अशाप्रकारे गतवर्षासाठी शुल्कात बदल केल्यास मागासवर्गीय विद्यार्थ्यांना दिल्या जाणा—या शिष्यवृत्तीचा शासनावर बोजा वाढतो. या महाविद्यालयाचे विद्यार्थी हे व्दितीय वर्षात त्याच महाविद्यालयात शिकत असल्यामुळे त्यांनी प्रवेश घेतेवेळी असलेले शुल्क यात वाढ झाल्याचे कळल्यावर त्यांच्यावर देखील आर्थिक बोजा वाढू शकतो. हे टाळण्यासाठी अभ्यासक्रमाचे शुल्क दोन वर्षांमध्ये विभागून निश्चित केलेले आहे.

३. शिक्षण शुल्क समितीच्या दि.१४.०७.२०१५ च्या बैठकीतील ठरावानुसार ५ टक्के अंतरिम वाढ ही २०१०—११ ला अंतिम मान्य केलेल्या शुल्कात करावी व विद्यार्थ्यांवर खूप जास्त बोजा पडू नये म्हणून अभ्यासक्रम दोन वर्षाचा झाल्याने शुल्क दोन वर्षात विभागून घ्यावे, असे ठरले. तसेच दि.२३.०३.२०१६ च्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीत सदर ५ टक्के अंतरिम वाढ ही अंतिम असून ती सदस्य सचिवांची प्रमाणित करून द्यावी, असे ठरले.

या बाबी मा.उच्च न्यायालय, औरंगाबाद खंडपीठ यांचे निदर्शनास उच्च शिक्षण संचालनालयाने आणून दयाव्यात असे ठरले.

४. आर.सी. पटेल अध्यापक महाविद्यालय, शिरपूर यांनी दाखल केलेल्या मा.उच्च न्यायालयातील याचिका क्र. WP 384/2016 च्या अंतरिम आदेशान्वये शिक्षण शुल्क वर्ष २०१५—१६ करिता जरी प्रस्ताव प्राप्त झालेले आहेत तरी महाविद्यालयाचे, विद्यार्थ्यांचे तसेच शासनाचे आर्थिक नुकसान होवू नये म्हणून दि.२३.०३.२०१६ च्या शिक्षण शुल्क समितीच्या बैठकीत सदर ५ टक्के अंतरिम वाढ ही २०१५—१६ ला शिक्षणशास्त्र अभ्यासक्रमास प्रवेशीत विद्यार्थ्यांकरिता अंतिम आहे.

हा ठराव या व अशाप्रकारे मा. न्यायालयाच्या आदेशान्वये शिक्षण शुल्क समितीस प्राप्त होणा—या प्रस्तावांकरिता अन्य महाविद्यालयांना लागू राहील.

मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग यांच्या परवानगीने बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव,<br>
शिक्षण शुल्क समिती<br>
तथा<br>
शिक्षण संचालक,<br>
उच्च शिक्षण,<br>
महाराष्ट्र राज्य, पुणे

अध्यक्ष,<br>
शिक्षण शुल्क समिती<br>
तथा<br>
प्रधान सचिव,<br>
उच्च व तंत्र शिक्षण विभाग,<br>
मंत्रालय विस्तार, मुंबई—३२